**प्रेसनोट दिनांक २८/०७/२०१९**

**पोलीस स्टेशन- येरवडा पोलीस स्टेशन,पुणे**

**कम्युनिटी पोलीसींग व पोलीस काका संकल्पने अंतर्गत विबग्योर स्कूल, येरवडा, पुणे येथे शिक्षकांची बैठक घेवून मार्गदर्शन केले.**

---

कम्युनिटी पोलीसींग व पोलीस काका या संकल्पने अंतर्गत श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पो.उप.निरी. श्री. व्ही.जे.माने यांनी दि.२२/०७/२०१९ रोजी सकाळी १०:३० वा. ते ११:४५ वा.चे दरम्यान विबग्योर हायस्कूल, कॉमरझोनचे पाठीमागे, येरवडा, पुणे येथे भेट देऊन तेथील शिक्षकांची व बालकांची बैठक घेवून त्यांचेशी सुसंवाद साधला त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. तसेच त्यांना पोलीस काका संकल्पनेची माहिती दिली. तसेच बालकांचे संदर्भात घडणारे गुन्हे, बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा २०१२ मधील तरतुदींची माहिती देऊन, बालकांचे सुरक्षेच्या दृष्टीने घ्यावयाचे खबरदारी, दक्षता यांचे बाबत मार्गदर्शन केले. सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे महत्व समजावून सांगून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आवाहन केले. सदर बैठकीचे वेळी १० ते १२ शिक्षक व १०० ते १२५ शालेय विद्यार्थी हजर होते.

**( राजेंद्र कदम )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे




POLICEMAN VISIT